दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● रविवार ९ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३०१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# कितीही रॅली काढा, तुम्हाला रपारप पाडणार, मनोज जरांगे यांनी फडणवीसांना पुन्हा घेतलं अंगावर

**मनोज जरांगे यांनी यावेळी आम्हाला आरक्षण द्या नाहीतर विधानसभेला नाव सांगून उमेदवार पाडू असं चॅलेंज सरकारला दिलं आहे.**

तुम्हाला 106 आमदार मराठ्यांनी निवडून दिले. आता जे 10 टक्के तुम्ही आरक्षण दिलेलं आहे.त्यात सगळीकडे काड्या केलेल्या आहेत. महामंडळ गोरगरिबांच्या कामाचे नाही. तुम्ही नवीन उद्योजकांना अटी का घातल्या. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे कर्ज मिळत नाही, मी फडणवीस यांना विरोध करतो असं नाही, सगे सोयऱ्यांची अंमलबजावणी करा, केसेस आमच्यावर केल्या. तुम्ही मराठ्यांवर लाखात गुन्हे दाखल केले, महायुतीने आमचे हे हाल केलेत. महाविकास आघाडीने काही आम्हाला तुपाचे डब्बे दिलेले नसल्याचंही मनोज जरांगे म्हणाले.




लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील चर्चेत आले आहेत. मनोज जरांगे आरक्षणासाठी आजपासून अंतरवाली सराटी येथे पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत. यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी भाजप विधानसभा निवडणुकीआधी काढणाऱ्या रॅलीचा धागा पकडत थेट फडणवीसांवर निशाणा साधला आहे. आम्हाला आरक्षण नाही दिलं तर विधानसभेला मजाच बघा, तुम्ही कितीही रॅली काढा, तुम्हाला रपारप पाडणार, असं म्हणत जरांगेंनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पुन्हा एकदा अंगावर घेतलं आहे.

मनोज जरांगे-पाटील काय म्हणाले?

फडणवीस साहेब तुम्ही भ्रमात राहू नका जे घडलेले आहे ते मान्य करा. मराठ्यांच्या पोरांना आरक्षणाचा फायदा करून द्या आम्हाला आरक्षण द्या, गुन्हे मागे घ्या, मला राजकारणात जायचं नाही, आम्हाला आरक्षण द्या, जर तुम्ही मागण्या पूर्ण केल्या तर मराठे तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचतील. तुम्ही जर आरक्षण दिलं नाही तर तुम्हाला एकालाही निवडून येऊ देणार नाही, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.तुमचे प्रवक्ते काहीही बोलतात त्याचे परिणाम फडणवीस यांना भोगावे लागतात. तुमच्या प्रवक्त्यांना वेसण बांधा, महाविकास आघाडीने आमचे आधी थोबाड फोडलेले आहे, पण तुम्ही आता ताजा अन्याय केलेला आहे.

## राज्यातील अनुदानित शाळा विनाअनुदानित करण्याचा राज्य सरकारचा निर्णय ,पालकांचे तीव्र आंदोलन


**दैनिक वादळ वार्ता**
**नाशिक/ सुरेश इंगळे**

राज्यातील अनुदानित शाळा विनाअनुदानित करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयामुळे संतप्त झालेल्या पालकांनी त्याचा विरोध करीत शिक्षण कार्यालयात आंदोलन केले. पालकांची भूमिका ही राज्य शासनाला कळविण्यात येईल असे आश्वासन शिक्षण उपसंचालकांनी दिले. राज्य शासनाने अलीकडच्या काळामध्ये एक स्वतंत्र आदेश काढून ज्या शासनाच्या अनुदान घेणारा शाळा आहेत त्या विनाअनुदानित, म्हणजे कोणतेही अनुदान राज्य सरकारकडून त्या शाळांना मिळणार नाही असा निर्णय घेतला. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये मोठ्या प्रमाणावर खाजगी शाळांची फी वाढणार आहे .आणि त्यामुळे पालकांना मोठा भुदंड सहन करावा लागणार आहे .त्यामुळे संतप्त झालेल्या नाशिक मधील पालकांनी एकत्र येऊन नाशिक रोड येथील शिक्षण उपसंचालकाच्या कार्यालयामध्ये तीव्र आंदोलन केले. त्यामुळे काही काळ या ठिकाणी खूप मोठा गोंधळ निर्माण झाला होता .परंतु वेळेतच पोलिसांनी आपला बंदोबस्त ठेवीत आंदोलन आटोक्यात आणले. त्यानंतर सुमारे दोन एक तासाच्या आंदोलनानंतर शिक्षण उपसंचालक हे कार्यालयात आले. आणि त्यांनी या ठिकाणी पालकांना आपली भूमिका ही शासनाला कळविण्यात येईल त्यानंतर शासन सांगेल त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## अंबाजोगाई शहरासह ग्रामीण भागात देखील विजांच्या कडकडाट सह जोरदार पावसाने लावली

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास पडलेल्या पावसाने नागरिकांची मोठी धावपळ उडाली. हा पाऊस अंबाजोगाई तालुक्यात व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी कोसळला. वारा आणि विजांचा प्रचंड कडकडाट झाला. वीज कोसळल्याची माहिती मिळाली नाही. पावसाने पुन्हा वीज पुरवठा खंडित झाला होता. सकाळ पासूनच पावसाचे वातावरण निर्माण झाले होते यंदा पाण्याचे दुर्भिक्ष फेब्रुवारी, मार्च महिन्यांपासून जाणवायला लागले आहे. जुन महिन्याच्या प्रारंभी ही ऊन्हाची तीव्रता कायम आहे. कारण, गतवर्षी पावसाळ्यात अत्यल्प प्रमाणात पाऊस झाला होता. त्यामुळे यावर्षी अंबाजोगाई तालुक्यासह संपूर्ण केज विधानसभा मतदारसंघातील अनेक पाणी पुरवठा योजनांच्या घशाला कोरड पडली आहे. कमी पावसामुळे गतवर्षीचा खरीप व रब्बी हंगाम धोक्यात आला. म्हणावे तेवढे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळाले नाही. त्यामुळे यंदा चारा, पाणी टंचाई निर्माण झाली आहे. अशातच यावर्षी उष्णता अधिक जाणवलेली आहे. यंदा मुबलक प्रमाणात पाऊस पडतो का ते माहीत नाही. अशा वेळी अधूनमधून अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतातील गहू, ऊन्हाळी यासह विविध काढणीस आलेली पिके आणि आंबा, द्राक्ष, चिक्कू, टरबूज, खरबूज, केळी या फळ पिकांचे मोठे नुकसान झाले होते. अवकाळी पाऊस हा नेहमीच मारक ठरतो. अंबाजोगाई शहर व तालुक्यात मागील काही दिवसांत अधूनमधून पडलेल्या हलक्या पावसाने ऊन्हाची तीव्रता कमी होण्यास मदत झाली आहे.



परंतु पुढील काही दिवसांत तसेच पेरणीसाठी खते व बियाणे खरेदी करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी आलेल्या शेतकऱ्यांची मात्र या पावसाने मोठी त्रेधा तिरपीट उडाली होती. हा पाऊस अंबाजोगाई तालुक्यात अनेक ठिकाणी कोसळला असल्याचे समजते. सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा प्रचंड कडकडाट झाला. बातमी पाठवेपर्यंत अंबाजोगाई शहरानजीक कुठे वीज कोसळल्याची माहिती मिळाली नाही. या पावसामुळे हवेत किंचितसा गारवा निर्माण झाला आहे. असे असले तरी या पावसाने पुढील काळात गर्मी, उष्णता कमी होण्यास मदत होणार आहे. हे मात्र नक्की. इतर काही नुकसान झाले असल्याची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीची मशागत पुर्ण झाल्यानंतर आता मोठ्या प्रतीक्षा आहे. संपूर्ण अंबाजोगाई तालुक्यात शंभर मिलीमीटर पेक्षा अधिक पाऊस झाला तरच पेरणीसाठी वेग येईल. अंबाजोगाई शहरासह ग्रामीण भागात देखील विजांच्या जोरदार पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात काहीसा गारवा जाणवत आहे.

## सोयगाव तालुक्यात ,३६६ ,विहिरी व ,३६ बोअरचे पुनर्भरणाचे नियोजन तहसीलदार मनीषा मेने यांची माहिती

**दैनिक वादळ वार्ता**
**छ.संभाजीनगर/चैताली औटे**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील..सोयगाव तालुक्यात ३८ गावांमध्ये ता.३० जूनपर्यंत ३६६ विहिरींचे व ३६ ,बोअर चे पुनर्भरणाचे नियोजन हाती घेण्यात आल्याची माहिती तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांनी शनिवारी दिली आहे ता.०८ जून पासून पंचायत समिती, कृषी आणि महसूल या यंत्रणा कामाला लागल्या आहे दरम्यान गाव परिसरात एक किमी अंतरावर असलेल्या विहिरी आणि गावातील विहिरी यांचे पुनर्भरण करण्यात येत आहे

सोयगाव तालुक्यात शासनाने पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी जल समृद्ध गाव अभियान हाती घेतले आहे सोयगाव तालुक्यातील ३८ गावात हा उपक्रम राबविण्यात येत आहे तीस जूनपर्यंत हे अभियान सुरू आहे तहसीलदार मनीषा मेने यांनी यासाठी आढावा बैठक घेवून यंत्रणांनी कामाला लागण्याच्या सुचना दिल्या आहे दरम्यान या अभियानात सोयगाव तालुक्यात शासकीय इमारतीचेही पुनर्भरण करण्यात येऊन ३२९ शासकीय व निमशासकीय इमारती वर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसवून या इमारतीच्या पुनर्भरण करण्यात येऊन इमारती चे वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरविण्यात येणार आहे.....

## ज्ञानेश महेश चौंडे यांचे नीट परीक्षेत घवघवीत यश



परळीयेथील ज्ञानेश महेश चौंडे यांनी नीट परीक्षेमध्ये ७२० पैकी ६५७ मार्क घेऊन यश संपादन केले आहे. ज्ञानेश हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा माजी नगरसेवक रमेशअण्णा चौंडे यांचा पुतण्या आहे. ज्ञानेश महेश चौंडे याने नुकत्याच झालेल्या वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी महत्वाची असणारी परिक्षा नीट मध्ये ६५७ गुण घेवून घवघवीत यश संपादन करून तो एमबीबीएससाठी पात्र ठरला आहे. ज्ञानेश चौंडे याने विविध स्पर्धा परिक्षेत सहभाग घेवून यश संपादन केले आहे.ज्ञानेश याचे इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षक फाउंडेशन स्कुल येथे तर अकरावी व बारावीचे शिक्षण वैद्यनाथ महाविद्यालयात झाले आहे. त्याने अत्यंत चिकाटीने व मेहनतीने हे यश संपादित केले आहे. त्याला आई, वडिल व गुरूजनांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## तक्रारी न केलेल्या शेतकऱ्यांना मिळणार विम्याची रक्कम ;जुलै मध्ये मुहूर्त

**दैनिक वादळ वार्ता**
**छ.संभाजीनगर/चैताली औटे**

खरिपात दुष्काळाच्या नुकसानी च्या तक्रारी न केलेल्या जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना पीकविमा ची रक्कम जुलै च्या पहिल्या आठवड्यात मिळणार असल्याचा निर्णय शुक्रवारी झालेल्या कृषी आणि कंपनीच्या राज्य समन्वयक बैठकीत घेण्यात आला आहे त्यामुळे आता सोयगाव तालुक्यातील वंचित शेतकऱ्यांना जुलै पर्यंत पिकविम्याचे प्रतीक्षा करावी लागणार आहे अती गंभीर दुष्काळ घोषित झालेल्या जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील २६,५४७ ,शेतकऱ्यांनी नुकसानी च्या तक्रारी न केल्याने या शेतकऱ्यांना अद्यापही पीक विम्या पासून वंचित राहावे लागले मात्र पोर्टलवर नुकसानीच्या तक्रारी न मिळालेल्या शेतकऱ्यांना शासनाने पीक कापणी प्रयोगाच्या निकषानुसार नुकसानीची तीव्रता ठरवून पीकविमा देण्याचा निर्णय घेतला होता परंतु पंचायत, कृषी आणि महसूल यांच्या त्रिस्तरीय समितीचे पीक कापणी अहवाल अद्यापही संकलित न झाल्याने २६ ,हजार ५४७ पोर्टल वर तक्रारी न केलेल्या शेतकऱ्यांना पिकविम्यापासून वंचित राहावे लागले आहे परंतु शुक्रवारी जिल्हा कृषी विभाग आणि पीक विमा कंपनीच्या राज्य समन्वयक बैठकीत जुलै पर्यंत या शेतकऱ्यांना पीकविमा देण्याचे कंपनीने आश्वासन दिले आहे त्यामुळे या वंचित शेतकऱ्यांना जुलै महिन्यात पिकविम्याची रक्कम मिळणार आहे त्यामुळे आता ऑफ लाईन शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे

अती गंभीर दुष्काळ जाहीर झालेल्या सोयगाव तालुक्यात पीकविमा भरूनही नुकसानी ची तक्रार न केलेल्या कपाशी,सोयाबीन, ज्वारी,बाजरी,उडीद,मूग आणि तूर या पिकांचे पिकविम्याचे रक्कम मिळाली नव्हती दरम्यान सोयगाव तालुक्यात अती गंभीर दुष्काळाची दाहकता पाहणी साठी डिसेंबर महिन्यात आलेल्या केंद्रीय पाहणी पथकांनी सोयगाव तालुक्यात खरीप पिकांचे दुष्काळात शंभर टक्के नुकसान झाल्याचा अहवाल केंद्राकडे सादर केला होता त्यामुळे तक्रारी न केलेल्या शेतकऱ्यांना दुष्काळाच्या छायेत असल्याने या शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळण्यासाठी पीक कापणी प्रयोगाचा निकष ग्राह्य धरून या पीक कापणी प्रयोगातून उत्पन्नाच्या एकूण नुकसानी मधून भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला होता परंतु महसूल,कृषी आणि पंचायत या विभागांनी पीक कापणी तक्ते देण्यासाठी विलंब झालंय मुळे अद्यापही उत्पन्नाचा सरासरी प्रमाण काढता न आल्याने पीक विमा मिळालेला नाही

-----अपात्र ठरविलेल्या शेतकऱ्यांनाही तातडीने पीकविमा द्या--जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांच्या सूचना

शुक्रवारी कृषी विभाग आणि पीकविमा राज्य समितीचे सदस्याच्या झालेल्या बैठकीत कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांनी ज्या शेतकऱ्यांना अपात्र करण्यात आले आहे मात्र त्यांच्या शेतीच्या उताऱ्यावर पीक पेर्याची नोंद आहे अशा शेतकऱ्यांना तातडीने आठवड्यच्या आत पिकविम्याचे रक्कम देण्याची सूचना कृषी अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांनी पीकविमा कंपनीला दिल्या आहे सोयगाव तालुक्यातील सोयाबीन च्या ८,४७४ शेतकऱ्यांना पीकविमा कंपनीने ई पीक पेरा ची नोंद नसल्याने अपात्र केले होते व काही शेतकऱ्यांना सामुहिक क्षेत्राची संमती न दिल्याने अपात्र केले आहे अशा शेतकऱ्यांचाही फेर विचार करून जूनच्या आत या शेतकऱ्यांना पिकविम्याचे पैसे खात्यात वर्ग करण्याचा सूचना विमा कंपनीच्या राज्य समन्वयक समिती च्या बैठकीत देशमुख यांनी दिल्या आहे

कोट--सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्याच्या वंचित पिकविम्याचे प्रश्नावर कृषी अधिक्षक जिल्हा कृषि अधिकारी प्रकाश देशमुख यांनी बैठक घेत मार्ग काढला आहे त्यामुळे जुलै पर्यंत पिकविम्याचे प्रश्न मार्गी लागेल....

मदन सिसोदिया
तालुका कृषी अधिकारी सोयगाव

कविता

## आर्जव

एक घडा माझ्या
अंगणात रिचव
पावसा मलाही
तुझ्या संग भिजव

इवलंस बिज
मातीमंधी रुजव
धरतीची आग
तूच बरे विझव

वसूधेचे हातं
मेहंदीन सजव
तिच्या वर नभा
तूच सत्ता गाजव

दानशूर नभा
ऐक माझी आर्जव
वर्षाच्या स्वागता
ढोलताशे गर्जव

झाडे तोडणाऱ्या
तूच धडा शिकव
मुक्या जीवांसाठी
रानं मात्र पिकव

विद्या सरपाते

# जलदूत राजेश काकडे यांचे दुष्काळात पाच गावांना मोफत पाणी वाटप

## गावची तहान भागण्यासाठी चक्क विकले बायकोचे सोने....

## दोन बोर आणि पाच गावांची तब्बल सात महिन्यापासून भागवतोय तहान...

**वादळवार्ता/बीड**

बीड जिल्ह्यातील नेहमीचा दुष्काळ कधी हटलाच नाही, बीड जिल्ह्यात कधी अवकाळी कधी दुष्काळ कधी ओला तर कधी सुखा दुष्काळ यांनी बीड जिल्हा आणि शेतकरी नेहमी ग्रासलेला राहायचा यात पाणीटंचाईचा देखील फटका दर उन्हाळ्यात शेतकऱ्यांना बसतच होता मात्र बीड जिल्ह्यातील एका अवलियाने चक्क बायकोच्या अंगावरील सोने विकत पाच गावांची तहान भागवली आहे. गेल्या सात महिन्यापासून हा अवलिया या गावांची ताहान भागवत मागचा पुढचा कोणताही विचार न करता अविरत आपला संकल्प पार पाडतोय. बीड जिल्ह्यातील बीड तालुक्यात असलेलं जरूड हे गाव या गावात नेहमी आसमानी सुलतानी संकटांचा फटका बसतच होता यात पाणीटंचाई देखील नेहमीच असायची यावर नेहमीच ग्रामपंचायत देखील वेगवेगळ्या पद्धतीने या सगळ्या संकटावर मात करायचा प्रयत्न करत होती. मात्र दुसरीकडे एक अवलिया या संकटावर आपल्या परीने मात करायचा प्रयत्न करत होता यामध्ये राजेश काकडे नावाचा हा अवलिया चक्क त्याच्याकडे असलेल्या तुतपुंज जमिनीमध्ये या गावात काम करत राहत होता. या जमिनीवरच त्याचा उदरनिर्वाह चालत होता त्यासोबतच बीड शहरातील एका खाजगी ठिकाणी येतो काम हे करत होता मात्र गावातील पाण्याची टंचाई पाहता त्यालाही टंचाई झोप येऊन देत नव्हती मात्र ही टंचाई कशा पद्धतीने दूर करायची या विचारात असतानाच आपल्याजवळ असलेला बोर हे आपल्या शेताला पाणी पुरवतो मात्र आपल्या शेतामध्ये डाळिंबाची बाग बाजरी आहे याचं काय



होणार मात्र याचा विचार न करता आपल्याकडील पाणी हे गावांना वाटण्याचा निर्णय सात महिन्यापूर्वी राजेशने घेतला मात्र पाणी वाटप सुरुही केलं मात्र गावाला एका बोरमध्ये पाणी पुरत नव्हतं या विवंचनेमध्ये कोणालाही काही न बोलता हा प्रस्ताव घरच्यांसमोर मांडला की आपण दुसरा बोर घेऊ मात्र याला घरच्यांनी विरोध केला कारण यासाठी जे पाणी आपल्या शेताला जातं ते आपण तर दुसऱ्याला देतोच मात्र याचा फायदा आपल्याला काय मात्र हा विरोध जुगारून त्यांनी चक्क पैसे नसताना बायकोच्या अंगावरील सोने विकले यातून एक बोर घेतला आणि पुन्हा एकदा त्याच्या संकल्पना त्यांनी सुरुवात केली. हळूहळू हळू जरूर गावात तर पाणी वाटपच केलं तर जवळपास असलेल्या शिवनी भगवान वाडी कुठे वाडी बाबळखुंटा गायकवाड वाडा व अन्य छोट्या-मोठ्या वस्ती या ठिकाणी लोक या ठिकाणी पाणी भरण्यासाठी येऊ लागले हे पाणी गेल्या सात महिन्यापासून या लोकांची तहान भागवत आहे खरं तर राजेश काकडे यांच्या या कार्याला सलामच केला पाहिजे आज जवळपास पाच ते सात गावांपर्यंत त्यांनी घेतलेला दोन बोरचे पाणी हे पोहोचत आहे मात्र या गोष्टीची दखल घेत ग्रामपंचायत देखील त्याच्या कार्यात हातभार लावत गेली कारण एकटा जर इतक्या गावांची तहान भागवत असेल तर आपण देखील त्याला मदत करणं ही गरजेचं असल्याचं सरपंच म्हणतात यामध्ये गावचे सरपंच श्रीराम काकडे यांनी देखील राजेशला मदत करावयास ठरवलं कारण गावातील कोणतं कार्य असल यामध्ये समोरच्या व्यक्तीची परिस्थिती नसेल तर मोफत हे पाणी तिथपर्यंत राजेश पोहोचतो यासाठी हातभार देखील ग्रामपंचायत ने लावला तो एकटा पुरु शकत नसल्यामुळे त्यांचे मोठे बंधू पंजाब रामचंद्र काकडे यांनी देखील आपल्या छोट्या भावाच्या ह्या कौतुकास्पद कामगिरीत हातभार लावायला सुरुवात केली आज जवळपास जरडूपासून ते सात गावांपर्यंत हे पाणी वाटप अविरत चालू आहे आज जरी जिल्ह्यामध्ये दुष्काळ पाण्याचा पडला जरी असला तरी या गावापासून असलेल्या छोट्या मोठ्या गावांना गेल्या सात महिन्यापासून राजेश काकडे हा पाणीपुरवठा आहे आणि त्यांची तहान भागवत आहे त्याच्या या कार्याला सलाम...

या सगळ्या कार्यामध्ये राजेश काकडे ,यांचे मित्र श्याम काकडे ,अशोक काकडे, विठ्ठल जाधव ,कल्याण काकडे ,इत्यादी लोकांनी त्याला या सात महिन्यात सहकार्य करत काम केला आहे.

# उरण शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यात ग्रामीण भागात व उरण शहरातील भागात मोकाट भटकणाऱ्या व नागरिकांवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या कुत्र्यामुळे उरण मध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सकाळी शाळेत जाणारे मुले, मॉर्निंग वॉक करणारे नागरिक, रात्री उशिरा कामावरून घरी परतणारे कर्मचारी कामगारांवर ही मोकाट कुत्रे हल्ले करत असल्याने उरण तालुक्यातील ग्रामीण भागात व उरण शहरात प्रवास करणे आता धोक्याचे झाले आहे.अनेक ठिकाणी नागरिकांना प्रवास करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

उरण नगरपरिषद हद्दीमध्ये नगर परिषद प्रशासनाने पाहिजे तसे लक्ष न दिल्याने मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उरण नगर परिषद हद्दीतील वीर सावरकर मैदान (लाल मैदान) येथे काही दिवसांपूर्वी मोकाट कुत्र्यांनी एका व्यक्तीला हातावर चावून जखमी केले होते. जखमी व्यक्तीला त्वरित हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले होते.मात्र नगर परिषदेने या महत्त्वाच्या समस्या कडे दुर्लक्ष केल्याने सदर मोकाट कुत्र्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.उरण नगर परिषदेने सक्षम यंत्रणा राबून निर्मिती करण्याची प्रक्रिया राबवावी व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या संदर्भात तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर राजेंद्र इटकरे यांना संपर्क केला असता तो होऊ शकला नाही.



उरण शहरातील भटक्या कुत्र्यांवर नगर परिषदेने योग्य ती कारवाई करावी जेणेकरून मोकाट कुत्रे नागरिकांना त्रास देणार नाहीत. एखाद्या व्यक्तीला कुत्रा चावला व त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याला जबाबदार कोण ?. कुत्र्यांचे निर्बीजिकरण करण्यात यावे. जेणेकरून कुत्र्यांची संख्या वाढणार नाही. उरण नगर परिषदेने या समस्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी

**- डॉ. फरहान नेरेकर.नागरिक,उरण**

# अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या नागरी सत्काराचे आयोजन!

**वादळवार्ता/बीड**

विद्यार्थ्यांच्या जीवनाला व करिअरला निर्णायक वळण देणारा महत्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता १० वी आणि १२ वी ची परीक्षा असते. नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता १० वी आणि १२ वी वीच्या निकालात बीडमधील विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करत नावलौकिक मिळवला आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने दि. ११ जून २०२४ रोजी सायं ५.०० वाजता बीड शहरातील हॉटेल नीलकमल, बीड येथे मान्यवर, पत्रकार तथा प्रतिष्ठित नागरिकांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भव्य दिव्य नागरी सत्कार या कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याबरोबरच या गुणवंत विद्यार्थ्यांना घडविण्यात प्रत्येक शाळेची आणि पालकांची देखील महत्वपूर्ण आणि प्रमुख भूमिका असून अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या शाळेचा आणि त्यांचा पालकांचा देखील नागरी सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती अनिलदादा जगताप फाउंडेशनकडून देण्यात आली आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या सोहळ्यासाठी शाळेचे मुख्यद्यापक, शिक्षक तथा पालकांनी भारगच्च संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अनिलदादा जगताप फाउंडेशनकडून करण्यात आले आहे.

## माजलगाव शहराने बजरंगबाप्पांना खासदार करण्या साठी 3671 लीड दिली-माजी नगराध्यक्ष शेख मंजूर.

माजलगाव प्रतिनिधी दि.6बीड लोकसभा निवडणुकीत अटीतटीत झालेल्या सामन्यात माजलगाव शहराने महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांना तब्बल 3671 मताधिक्याची लीड दिली.त्यामुळे बजरंगबप्पा सोनवणे यांचा विजय झाला.त्यात इंडिया आघाडीचे सर्व नेते,पदाधिकारी,कार्यकर्ते यांचीही खूप खूप आभार माजलगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी मानले. बीड लोकसभेची पार पडलेली निवडणूक धनशक्ती विरोधात जनशक्ती या स्वरूपात पार पडली. या निवडणुकीत महाविकास आघाडीने सामान्य शेतकरी पुत्र बजरंगबप्पा यांना राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांनी उमेदवारी दिली होती.अत्यंत अतितटीच्या सामन्यात बजरंगबप्पा सोनवणे यांचा विजय झाला.या विजयाला हातभार लावण्याचा मोलाचा हिस्सा माजलगाव शहरानेही उचलला आहे.माजलगाव शहरातून पंकजाताई मुंडे यांना 9007 तर बजरंगबप्पा सोनवणे यांना 12678 एवढे मते पडली.यात तब्बल 3671 वाढीव मताचे मताधिक्य बजरंग सोनवणे पडले.दरम्यान हे मताधिक्य मिळवून देण्यासाठी इंडिया आघाडी व मित्र पक्षाच्या सर्वच नेते,कार्यकर्ते,पदाधिकारी यांनी मोलाची मेहनत घेतली होती.

# कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ट्राफिक सेल कार्यान्वित करण्याच्या सूचना

**दैनिक वादळ वार्ता**
**नाशिक/सुरेश इंगळे**

शहराचा वाढता विस्तार व वाहनाची वाढती संख्या तसेच आगामी कुंभमेळ्यात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता केंद्र शासनाच्या वाहतूक मंत्रालयाने अपघात व अपघातातून होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना ट्रॅफिक सेल कार्यान्वित करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे महापालिकेत ट्राफिक सेल कार्यान्वित झाला असला तरी त्यासाठी स्वतंत्र अधिकारी व यंत्रणा आतापर्यंत नसल्याने त्या सेल कडे अतिरिक्त कार्यभार म्हणून पाहिले गेले होते .मात्र आता कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ट्राफिक सेल कार्यान्वित



केला जाणार आहे. त्याचप्रमाणे शहराची लोकसंख्या सध्या स्थितीत २२ लाखाच्या आसपास आहे २०५० पर्यंत हीच लोकसंख्या ६० लाखापर्यंत जाईल असा अंदाज आहे. त्यामुळे शहरांमध्ये वाहतूक समस्या निर्माण होतील व कोंडीच्या निमित्ताने ध्वनी व वायू प्रदूषण निर्माण होईल, त्यामुळे ट्राफिक सेल कार्यान्वित करणे आवश्यक आहे. महापालिकेला तशा सूचना देखील करण्यात आल्या होत्या, राज्याच्या नगर विकास विभागाने महापालिकेला पत्र पाठवून वाहतूक व्यवस्था नियोजन करण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. ट्रॅफिक सेल माध्यमातून वाहतूक आराखडा तयार करणे, वाहन स्थळांची निर्मिती व वाहतूक बेटाचे सुशोभीकरण, रस्त्यावर सायकल ट्रॅक उभारणे, झेब्रा क्रॉसिंग तसेच फूटपाथ व गतिरोधकाची निर्मिती करणे, सार्वजनिक वाहतुकीसाठी डेपोस सेंटरची उभारणी करणे, पूल व बांधकाम व ब्लॉग स्पॉट निर्मूलन करण्याची जबाबदारी ट्राफिक सेलवर आहे. सार्वजनिक वाहतुकीसाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे ही महत्त्वाची जबाबदारी आहे. ट्रॅफिक सेल करता कार्यकारी अभियंता व उपअभियंता व सहाय्यक अभियंता तसेच दोन कनिष्ठ अभियंता अशा एकूण आठ पदांची निर्मिती देखील महापालिकेकडून केली जाणार आहे. शहराच्या वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्यासाठी ट्रॅफिक सेलची निर्मिती करणे गरजेचे आहे .त्या अनुषंगाने कारवाई करण्यात आली असून यापुढे वाहतूक कक्षाच्या माध्यमातून सर्व नियोजन केले जाईल. अशी माहिती सचिन जाधव कार्यकारी अभियंता महानगरपालिका यांनी दिली आहे.

## बेलोरा गावाच्या रस्त्याची दुरावस्था.लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष..

**प्रतिनिधी .माजलगाव** तालुक्यातील बेलुरा ते बेलुरा फाटा या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दूर अवस्था झाली असून या ठिकाणी काल झालेल्या पावसामुळे सर्व रस्ता खरडून खचून गेला आहे त्यामुळे बेलोरा ग्रामस्थांना गावाबाहेर जाण्यासाठी रस्त्याचे दुरावस्था झालेली असून या रस्त्यामुळे गावातील वाहनांना जाण्यासाठी येण्यासाठी खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे अनेक दिवसापासून बेलोरा पासून अर्धा किमी असा हा बेलोरा फाटा रस्ता असून या रस्त्याच्या बाजूने गावातील जेलमिशन पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन टाकण्यात आली आहे या पाईपलाईन मुळे ही या जलमिशन पाणीपुरवठा योजनेच्या गुत्तेदाराने मनमानी करून आबड धोबड व कुठल्याही इस्टिमेट प्रमाणे ये पाईपलाईन बुजवण्याचे काम केलेले नाही त्यामुळे या रस्त्याच्या बाजूने ही पाईपलाईन केलेली आहे त्या पाईपलाईन वर मोठा वळण पडले आहे त्यामुळे अगोदरच खराब असलेला रस्ता व त्यामध्ये झालेले ही पाईप लाईन त्यात आणखीही भर पडल्याने हा रस्ता जाण्यासाठी अगोदरच दहा फुटाचा असून आता तर सहा सात फुटत राहिलेला दिसत आहे व त्यामुळे गावातील ग्रामस्थांना कार जीप टेम्पो ऑटो मोटरसायकल घेऊन येणे जाणे ही कठीण झाली आहे

# नवस फेडायला पायी चालला कार्यकर्ता बजरंग बाप्पा निवडुन येऊदे मी चालत तुळजापूर ला दर्शनासाठी येईल

**वादळवार्ता/केज**

बजरंग बाप्पा सोनवणे हे लोकसभा निवडणुकीत निवडून आल्यावर पायी तुळजापूर ला दर्शनासाठी येईल आसा नवस रवी मोरे मोरेवाडी,आश्रुबा करडे आपेगाव, गणेश घाडगे जोगाईवाडी या तीन बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वर जिवापाड प्रेम करणार्या कार्यकर्तेनी तुळजाभवानी मातेला नवस केला होता की माझा नेता खासदार होउदे आणि खासदार झाल्यावर आम्ही चालत तुळजापूर येथे येऊन माता आई जगदंबा तुळजाभवानी मातेच दर्शन घेऊ या बाबत सविस्तर वृत्त असे की नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुका या निवडणुकीत शरदचंद्र



पवार पक्षाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे आणि भाजपच्या पंकजा मुंडे या दोघा मध्ये तगडी लढत झाली, आणि शेवटच्या क्षणा पर्यंत कोणा जिंकणार आगदी शेवटच्या फेरी पर्यंत कोणालाही सांगणे शक्य नव्हते की कोण निवडून येईल आशातच बजरंग बप्पा सोनवणे यांच्यावर जिवापाड प्रेम करणारे हे त्रिमूर्ती यांनी तुळजाभवानी मातेला नवस केला की माझा नेता निवडुन आला तर आम्ही चालत तुळजापूर ला येऊ आणि सध्या पावसाचे दिवस आहेत परंतु नेत्यांच्या प्रेमाखातर कुठलीही जिवाची परवा न करता पावसाळा सुरू आहे विजाचा कडकडाट होत आहे परंतु देवीला बोलेला नवस फेडण्यासाठी चालत तुळजापूर कडे मार्गस्थ झालेले हे तीन मित्र अंबाजोगाई तालुक्यातील आपेगाव येथील आश्रुबा करडे, जोगाईवाडी येथील गणेश घाडगे,व मोरेवाडी येथील रवी मोरे यांनी निवडणुकीच्या आधी तुळजाभवानी मातेला नवस बोलला होता. विशेष म्हणजे बजरंग बप्पा निवडुन आले तर आम्ही पायी चालत तुळजापूर येथे दर्शनासाठी येऊ, असे साकडं घातलं होतं. तुळजाभवानीने हाक ऐकली यामुळे आता पायी निघालो असल्याचे या तरुणांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांना हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी जसं बळ दिलं तसेच बळ बीड जिल्ह्याचा विकास करण्यासाठी बजरंग बप्पा ला दे असे मागणेही मागणार असल्याचे या वेळी सांगितले,

# करोळ पाचघर च्या त्या पुलाची उंची वाढवलीच नाही या पावसाळ्यातही बंद होणार रस्ता, शासनाचा पुन्हा येरे माझ्या मागल्या कारभार

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर/सौरभ कामडी**

मान्सून अगदी उबराठ्यावर आला आहे यामुळे शेतकरी,पर्यटक यांच्यात आनंदाचे वातावरण आहे मात्र गत वर्षिच्या पावसाळ्यात तालुक्यातील अनेक गावांना जोडणारे रस्ते बंद झालं होते कित्येक ठिकाणी विद्यार्थी रुग्ण यांना जोराच्या प्रवाहात जीव हातात घेवून प्रवास करावा लागला होता याची दखल घेवून त्यावेळी बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन यांना लोकांच्या जीवाची किती कणव आहे दाखवण्यासाठी पाहणी दौरे केले खरे मात्र यावर वर्ष भरा नंतरही काहीच कार्यवाही न झाल्याने करोळ पाचघर या गावांना जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाची उंची वाढलीच नाही यामुळे यंदाही या गावचा रस्ता पाण्यात जावून संपर्क तुटणार हे नक्की यामुळे जेंव्हा एखादी घटना घडते तेंव्हा धावपळ करणाऱ्या प्रशासनाकडून पुन्हा येरे माझ्या मागल्या प्रमाणे कारभार होत आहे याचा फटका येथील लोकांना बसणार असल्याचे दिसून येते आहे. मोखाडा तालुक्यात गतवर्षी पावसाने उग्र रूप धारण केल्यानंतर अनेक गावांचा संपर्क तुटला होता यावेळी पुढील पावसाळ्यात अशी भयावह स्थिती उद्भवणार नाही अशी अपेक्षा होती मात्र आता दूसरा पावसाळा आला तरीही परिस्थिती जैसे थे राहिल्याने संताप व्यक्त होत आहे तालुक्यातील कोलेधव, कुर्लोद या गावांची स्थिती दैनिक पुढारी ने मांडल्यानंतर आता करोळ पाचघर या गावाला



जोडणाऱ्या रस्त्याच्या पुलाचा विषय ही ऐरणीवर आला आहे खोडाळा कसारा मुख्य रस्त्यापासून किमान पाच किमी आत मध्ये असलेल्या या गावाची लोकसंख्या १हजार ७००च्या आसपास आहे करोळ गावाच्या अलिकडे एका ओढ्यावर छोटा पुल आहे मात्र तो कमी उंचीचा असल्याने पावसाचे प्रमाण वाढले की त्यावरून पाणी वाहते आणि रस्ता बंद पडतो. गेल्या वर्षी जुलै मध्ये दोन ते तीन दिवस हा रस्ता बंद पाडल्याने नागरिकांचे मोठे हाल झाले होते. यामुळे थेट गावांचा संपर्क तुटत असलेल्या कामांना प्राधान्य देवून ती कामे तातडीने होणे आवश्यक असताना आज वर्ष भरानंतरही परिस्थिती जैसे थे राहणार असल्याने मग काही अनुचित घटना घडल्या नंतर धावपळ करणारी यंत्रणा अगोदरच काम का करीत नाही हा खरा सवाल आहे यामुळे कुर्लोद असो कोल्हेधव की पाचघर पुन्हा येथील जनतेची पावसाळ्यात तारांबळ उडणार हे नक्की. “ या संदर्भात मी स्वतः भर पावसाळ्यात ही पाहणी केली होती तालुक्यात मोठया प्रमाणावर गरज नाही तिथे संरक्षण भिंती बांधणारे शासन अशा गरजेच्या ठिकाणची कामे मात्र करीत नाही हे दुर्दैव आहे यामुळे तालुक्यातील गतवर्षी पावसात संपर्क तुटले ल्या,कुर्लोद,थाळेकरवाडी,मुकुंदपाडा, पाचघर येथील गावांचा यंदाही संपर्क तुटला आणि काही घटना घडल्यास त्याला शासन जबाबदार असेल हे नक्की

# करोळ पाचघर च्या त्या पुलाची उंची वाढवलीच नाही या पावसाळ्यातही बंद होणार रस्ता, शासनाचा पुन्हा येरे माझ्या मागल्या कारभार

माजलगाव प्रतिनिधी : शहरातील मध्यवर्ती भागामध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या नगर परिषदेच्या प्रशासकीय कार्यालयात असलेली मुतारी सर्वसामान्य जनतेसाठी सुद्धा आहे. परिसरातील बाजारपेठेत व्यावसायिक आणि ग्राहकांना मूत्रविसर्जनासाठी नगरपरिषदे कडून असलेली एकमेव व्यवस्था आहे. बाजूच्या बाजारपेठेतील व्यावसायिक आणि ग्राहकांना पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे आहे तशा परिस्थितीत मुत्रविसर्जन करावे लागते. सदरील मुतारीत पाण्याचे नळ तुटलेले आहेत, मूत्रविसर्जनाचे भांडे फुटलेले आहेत, नाल्या स्वच्छते अभावी भरून वाहत आहेत, बेसिनचे भांडे तुटलेले आहे, दोन्ही संडास मधील भांड्यात मैला तसाच आहे, भिंतीवर आक्षेपार्ह मजकूर लिहिले आहेत. या नगरपरिषदेच्याच पार्किंग मध्ये शहरातील आणि परिसरातील अनेक टवाळखोर पोरं रात्री अपरात्री गप्पा मारताना दिसून येतात तिथेच सिगारेट, दारू इत्यादींचे सेवन करताना नागरिक रोजच पाहतात, अनेक वेळा दुकानात उशिरापर्यंत काम करणाऱ्या कारागिरांना व्यापाऱ्यांना नगरपरिषद प्रशासकीय इमारतीमध्ये मूत्रविसर्जनासाठी जाताना या टवाळखोर टोळीच्या दहशतीखाली जावे लागते पार्किंग परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे असूनही अनेक वेळा मुतारीत दारूच्या बाटल्याचा खच पहावयास मिळतो असे तेथील नागरिकांनी सांगितले, एवढेच कमी काय तर नगरपरिषद प्रशासनाकडून मुतारीस काट्यांचा वेढा देण्यात आलेला आहे त्यामुळे मुतारी मध्ये जाणाऱ्या सामान्य नागरिकांना व व्यवसायिकांना आपण खरंच नरकामध्ये आहोत की काय असा भास होणे स्वाभाविक आहे. नगरपरिषद प्रशासनाकडे मात्र या समस्या कडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही किंवा जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. नगरसेवक फक्त आपल्याकडे मत मागण्यासाठी येतात, नागरी सुविधा सोडवण्यासाठी त्यांना वेळ नाही यापूर्वीही अनेक तोंडी तक्रारी अधिकाऱ्याकडे करण्यात आल्या परंतु उपाययोजना शून्य असा आरोप येथील नागरिकांनी व्यापाऱ्यांनी केला आहे सदरील व्यवस्थेमध्ये महिलांसाठी तर स्थानच नाही. यापूर्वी नगर परिषदेस स्वच्छता मोहिमे अंतर्गत बक्षीसही प्राप्त झाले होते शहरांमध्ये बड्या नायक-नायकांच्या स्वच्छता संदेश देणाऱ्या मिरवणुका सुद्धा निघाल्या होत्या, ‘स्वच्छ माजलगाव सुंदर माजलगाव’ ही दिलेली घोषणा प्रशासनाकडूनच धुळीस मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते आहे.

# आम्ही जनतेचा जनादेश नम्रपणे स्वीकारला आहे-ॲड.प्रकाश आंबेडकर

**वादळवार्ता/मुंबई**

आम्ही निराश झालो आहोत पण, आशा सोडलेली नाही. आम्ही आत्मपरीक्षण करून वंचित बहुजन आघाडीच्या रणनीतीतील त्रुटी तपासून आवश्यक त्या उपाययोजना जरूर करू. मतदारांबद्दल आमची कोणतीही तक्रार नाही. वंचित बहुजन आघाडीचा मूळ पायाच फुले-शाहू-आंबेडकर असून, “जय फुले, जय सावित्री, जय शाहू, जय भीम” यांच्याकडूनच आम्हाला ताकद मिळते. आमची बांधिलकी निरपेक्ष आहे. सामाजिकदृष्ट्या वंचित आणि शोषितांची बाजू मांडणे आणि त्यांच्या राजकीय प्रतिनिधित्व आणि हक्कांसाठी लढणे हेच आमचे ध्येय आहे. आम्ही आमच्या अपयशाचे आत्मपरीक्षण करू. हे समजून घेणे काही रॉकेट सायन्स नाही की, महाविकास आघाडीतील काही घटकांनी जाणीवपूर्वक वंचित बहुजन आघाडीला आघाडीत सामावून घेतले नाही. आम्हाला बैठकांसाठी आमंत्रित करण्यात आले होते. परंतु, ते सर्व मीडिया आणि मतदारांसाठी होते. आम्ही त्यांच्या जाळ्यात अडकलो आणि मतदारांना आमचा झालेला अपमान आणि आमच्या पक्षाप्रती महाविकास आघाडीची संकुचित वृत्ती पटवून देण्यात सपशेल अपयशी ठरलो. वंचित बहुजन आघाडीनेच आंबेडकरी चळवळ आणि संविधान वाचवण्याच्या लढ्याचे नेतृत्व केले होते. जेव्हा या प्रमुख पक्षांचे सदस्य सॉफ्ट हिंदुत्वात गुंतले होते आणि एनडीए 1 आणि 2 च्या सरकारच्या काळात राज्यघटनेत करण्यात येत असलेल्या सुधारणांवर मौन बाळगून होते. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएसोबत लढण्याचा अजेंडा नसल्याचे INDIA आघाडीच्या लक्षात आल्यावर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वापर केला. ‘संविधान वाचविण्याचा लढा’ आमच्या तत्त्वज्ञानातून आणि मोहिमेतून त्यांनी घेतला. INDIA आघाडीने दलित, आदिवासी, ओबीसी आणि मुस्लिम हे भाजपशी लढण्यास सक्षम विरोधक असल्याचे मतदारांना पटवून दिले. मात्र, प्रत्यक्षात या राजकीय पक्षांना केवळ स्वत:ला वाचवायचे होते आणि यासाठी त्यांनी बहुजनांच्या मतांचा वापर केला. मतदारांबद्दल आमची कोणतीही तक्रार नाही. त्यांना सांगितले गेले की, फक्त आणि फक्त INDIA आघाडीला मतदान केल्यास भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएपासून देश वाचवू शकतो. परंतु, तरीही एनडीए बहुमत मिळवण्यात यशस्वी झाला. INDIA आघाडीतील पक्षांचा ढासळणारा वाडा वाचवण्यासाठी आणि पुन्हा नव्याने उभारण्यासाठी बहुजन मतदारांच्या स्वतंत्र नेतृत्वाचा स्वत:चा बालेकिल्ला पाडायला भाग पाडण्यात आले. या पक्षांना संविधान वाचवायचे असते, सामाजिक दृष्ट्या वंचित व शोषितांसाठी लढायचे असते, तर वंचित बहुजन आघाडी स्थापन करण्याची गरजच पडली नसती. INDIA आघाडीतील पक्षांनी दलित, आदिवासी, ओबीसी, मुस्लीम यांची मते घेतली आहेत. पण, त्यांच्याकडून घेतलेल्या पाठिंब्याला ते न्याय देतील की नाही, हा येणारा काळच सांगेल. भेदभाव करणाऱ्या वैदिक धर्माविरुद्ध आणि सामाजिकदृष्ट्या वंचित आणि शोषितांसाठी आम्ही सुरू केलेला लढा या निवडणुकीने अधोरेखित केला आहे आणि आम्हाला त्याचा अभिमान वाटतो. कारण, येत्या 50 वर्षांपर्यंत भाजप वैदिकवाद आणण्याचा उच्चार करणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली



आहे. हा वंचितांनी उभारलेल्या मोठ्या लढ्याचा परिणाम आहे, सहभाग आहे. त्यामुळे कोणीही संविधान बदलण्याचे धाडस केल्यास वंचित आणि शोषितांच्या प्रतिनिधींना आणि समर्थकांना त्याविरोधात उभे राहण्याची अधिक संधी मिळेल. दहा वर्षे देशात भाजपची सत्ता होती. गेल्या पाच वर्षांपासून भाजपने संविधानाची मोडतोड करून वैदिकवाद मांडायला सुरुवात केली. या विरोधात इंडिया आघाडीतील काही पक्ष सोडले तर संविधानाच्या समर्थनार्थ, वैदिकवादाविरोधात कोणीही भूमिका घेतलेली नाही. वंचित बहुजन आघाडीने मात्र भाजपच्या या भूमिकेविरोधात रान उठवले. हा निवडणुकीचा मुद्दा होतोय हे लक्षात येताच हा मुद्दा इंडिया आघाडीने स्वत:कडे घेतला. महाविकास आघाडीच्या शेवटच्या बैठकीत महाविकास आघाडीने 2 जागा वंचित बहुजन आघाडीला देत असल्याचे सांगितले. त्यातील एक जागा अकोला आणि दुसरी जागा उत्तर मुंबई होती. महाविकास आघाडीचे नेते माध्यमाशी बोलताना या जागांचा आकडा 4 ते 6 सांगायचे आणि ते ज्या जागांचा उल्लेख करायचे त्यात आम्हाला 2019 मधे एक लाखाच्या वर मतदान मिळालेली एकही जागा नसायची. यावरून लक्षात आलेली गोष्ट म्हणजे उत्तर मुंबईची न जिंकता येणारी जागा होती, तर अकोल्याच्या जागेत कधीही गेम होऊ शकतो. इंडिया आघाडी बरोबर जाऊन पडणे आणि स्वत:च्या ताकदीवर लढणे यात फरक आहे. स्वत:च्या ताकदीवर लढून टिकण्याचा मार्ग कायम राहतो आणि म्हणून आम्ही टिकण्याचा मार्ग स्वीकारला. महाविकास आघाडीने एवढे अपमानित करुनही आम्ही सहभागी होण्यासाठी पुरेपुर प्रयत्न केला. यासाठीचे पहिले पाऊलही वंचित बहुजन आघाडीनेच टाकले. जे गेले अनेक महिने दुर्लक्षित केले गेले. एक गोष्ट आम्ही अधोरेखित करतो की, महाविकास आघाडीने काही ठराविक बैठकींना आम्हाला बोलावले. बाकीच्या बैठकांना बोलावले नाही. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीला थोडा वेळ आहे. येत्या काही महिन्यांत मतदारांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्यासाठी आम्ही त्यांच्यासोबत अधिक संवाद करू. आमच्यावर विश्वास दाखवणाऱ्या मतदार, समर्थक, हितचिंतकांना एकत्र घेऊन पुन्हा मोठ्या ताकदीने पुनरागमन करू. तसेच, सामाजिक दुष्प्रवृत्तींविरुद्ध आणि सामाजिक दृष्ट्या वंचित आणि शोषितांच्या स्वतंत्र राजकीय नेतृत्वासाठी आम्ही लढत राहू. जय फुले, जय सावित्री, जय शाहू, जय भीम, जय संविधान !

ॲड.प्रकाश आंबेडकर,

राष्ट्रीय अध्यक्ष, वंचित बहुजन

# खा. बंजरग बप्पा सोनवणे यांच्या विजयातील दोन मावळे मुकुंद कणसे आणि कपिल मस्के

**वादळवार्ता/केज**

बीड लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीचे बजरंग (बप्पा) सोनवणे यांचा विजय झाला. त्यात आघाडीच्या घटक पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि बजरंग बप्पा सोनवणे यांचे विश्वासू शिलेदार यांच्या मेहनत, परिश्रम आणि सांघिक प्रयत्न यांचा हा विजय आहे.

त्यांच्या या विजयात त्यांचे अनेक कार्यकर्ते अंग झाडून रात्र न दिवस काम करीत होते. अनेक वेळा उपाशीपोटी राहून प्रचंड मेहनत घेत पडेल ती कामे करण्याचे आदेश शिरसावंद्य मानून पळत होते. ते सर्वजण एकच विचार मनात पक्का ठरवून बजरंग बप्पा हे कसे निवडून येतील; या एकाच विचाराने



अनेक शिलेदार सर्वस्व अर्पण करत होते. बजरंग बप्पाच्या या विजयामध्ये राष्ट्रवादी पक्षाचा ए बी फॉर्म मुंबई राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यालयातून आणण्याची अत्यंत गुप्त जबाबदारी ही बंजरग बप्पा यांनी त्यांचे बिनीचे शिलेदार मुंकूद कणसे व कपिल मस्के यांच्यावर सोपवली होती. त्यांना एकाच रात्रीत मुंबईला जावुन सुरक्षितपणे पक्षाचा ए बी फॉर्म घेऊन वेळेत केजला यायचे होते. त्यासाठी बजरंग बप्पा सोनवणे यांनी मुकुंद कणसे आणि कपिल मस्के या आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना आदेश दिला. मुकुंद कणसे व कपिल मस्के यांनी हा आदेश शिरसावंद्य मानून तात्काळ रात्रीचा प्रवास चालु केला. मुंबईची त्याना जास्त माहित नव्हती म्हणून त्यानी पुण्यातून त्यांच मित्र अनिकेत आरकडे याला सोबत घेतले. त्या नंतर ते सकाळी मुंबई येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या नरिमन पॉइंट येथील कार्यालयात पोहचले. तेथील राष्ट्रवादी युवती कॉंग्रेस मुंबई शहराध्यक्ष आदिती नलावडे यांच्या कडून त्यांनी पक्षाचा ए बी फॉर्म हस्तगत करून दुसऱ्या दिवशी सहीसलामत आणि गुप्तता बाळगून कुणाला काही कल्पना न देता तो ए बी फॉर्म बंजरग बप्पा सोनवणे यांच्याकडे सुपूर्द केला. त्या नंतर मोठ्या जल्लोषात लोकसभेला बप्पाने फॉर्म भरून बजरंग बप्पा सोनवणे यांनी यांनी त्यांचे प्रतीस्पर्धी उमेदवारावर विजय मिळविला.

# वृक्षारोपण आणि वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

..५ जून २०२४ जागतिक पर्यावरण दिवस.या दिवसाच्या निमित्ताने नैसर्गिक पर्यावरण संवर्धन आणि मानवता विकास संस्था महाराष्ट्र ठाणे जिल्हा उपाध्यक्षा अनिता प्रविण कळसकर यांनी वृक्षारोपण आणि वृक्षवाटप कार्यक्रम चे आयोजन केले होते .कल्याण सार्वजनिक वाचनालय आणि शशांक बालविहार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा कल्याण पश्चिम येथे वृक्षारोपण आणि वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पार पडला. सार्वजनिक वाचनालयाचे सरचिटणीस मा.भिकू बारस्कर यांना मधुमालती चे झाड यांप्रसंगी भेट म्हणून देण्यात आले.तसेच वाचनालयातील ग्रंथपाल



आणि संपूर्ण वाचनालयातील महिला कर्मचारी यांना तुळशीचे रोपं आणि गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच शशांक बालविहार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेत कडूलिंब,बदाम, जांभूळ,तुती अशी वेगवेगळ्या प्रकारच्या झाडे लावण्यात आली.याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ वैशाली शिंदे मॅडम यांनी सहकार्य केले.नेफडो या संस्थेला झाडे लावण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली.याप्रसंगी नेफडोचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष श्री.कदम सर तसेच पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा अस्मिता सावंत , राष्ट्रीय महिला सचिव आसिया मॅडम यांनी उपस्थिती दाखवली.तसेच या नगरसेविका डोईफोडे याप्रसंगी उपस्थित राहिल्या.या सर्वांचे तुळशीचे रोप ,शाल गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.छोट्याश्या अल्पोपहारानंतर देऊन कार्यक्रम ची सांगता झाली.कार्यक्रम आनंदाच्या आणि उत्साही वातावरणात पार पडला.

## झाडपडीची झाडे हटविण्याचे काम सुरु



**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे /पंकज भंडारी**

पुणे शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे पुणे महापालिका अग्निशमन दलाकडे सद्यस्थितीत २५ पेक्षा अधिक ठिकाणी झाडपडीच्या घटनांची नोंद झाली असून ही संख्या वाढत आहे. पुणे अग्निशमन दलाच्या वतीनं विविध तुकड्या शहराच्या विविध भागात पोहोचल्या असून झाडे हटवण्याच्या कामालाही सुरुवात झाली आहे.




# शिरूर कासार बंदला चांगला प्रतिसाद अत्यावश्यक सेवा सोडता सर्व व्यवहार बंद

**वादळवार्ता/शिरूरकासार**

लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचेबाबत मोबाईलवर अक्षेपार्ह पोस्ट व त्यावरील कमेंट च्या विरोधात सकल वंजारी समाज व ओबीसी समाजाच्या वतीने शनीवारी बंदची हाक दिली होती त्याअनुषंगाने शनिवारी सर्व व्यवहार बंद ठेऊन प्रतीसाद देण्यात आला . पंकजा मुंडे यांचा या निवडणुकीत निसटता पराभव झाला ,मात्र काहीनी त्यांचे विरोधात अक्षेपार्ह पोस्ट करून समर्थकांच्या भावनेला ठेच पोहचली ,त्याचा निषेध करत बंदची हाक देण्यात आली .शांतता प्रिय शिरूर कासारकरांनी आपले व्यवहार बंद ठेवले होते फक्त अत्यावश्यक सेवा सुरू होत्या .सकाळी साडेनवूच्या सुमारास समर्थकांनी रॅली काढून घोषणा देत, पोस्ट टाकणा-यावर व कमेट करणाराधर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. एकंदरीत बंद शांततेत पार पडावा यासाठी स.पो. नी.गणेश. धोकरट यांनी पोलीस यंत्रणा सतर्क ठेवली होती .

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )